क्रमांक : का.स./बैठक/१९८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ३ जुलै, २००२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ जून, २००२ (शुक्रवार) रोजी झालेल्या १९८ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

(सुरेश परदेशी)
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

| | | |
|---|---|---|
| शासनाचे मुख्य सचिव<br>सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे<br>ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,<br>सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,<br>नागपूर - ४४० ०१५. | - | सदस्य |
| श्री.दिपक पारेख<br>अध्यक्ष, एचडीएफसी लिमिटेड,<br>रेमन हाऊस, चर्चगेट,<br>मुंबई - ४०० ०२०. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>नगर विकास विभाग, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

...२/-

| | | |
|---|---|---|
| महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको, निर्मल, नरीमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२३. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण. | - | सदस्य |

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण)
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या १९८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २१ जून, २००२ (शुक्रवार) |
| वेळ | : | सकाळी १०.०० वाजता |
| सभास्थान | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,<br>समिती कक्ष, ६ वा मजला,<br>वांद्रे-कुर्ला समुह, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई - ४०० ०५१. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.व्ही.रंगनाथन<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.क.चं.श्रीवास्तव<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

निमंत्रित :

श्री. सुभाष लाला
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग

श्री.रविभूषण बुध्दिराजा
शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण),
पर्यावरण विभाग

श्री.यू.पी.एस.मदान
प्रकल्प संचालक,
मुंबई नागरी परिवहन प्रकल्प

श्री.प्र.ल.बोंगिरवार
अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वा.घांगुर्डे
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, मुख्य सचिव व अध्यक्ष यांनी, कार्यकारी समितीचे सदस्य श्री.दिपक पारेख हे कार्यकारी समितीच्या बैठकीस हजर रहात नसल्यामुळे त्यांच्या ऐवजी दुस-या तज्ञ सदस्याची कार्यकारी समितीवर नेमणूक करण्याबाबतच्या प्राधिकरणाने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर

तातडीने कार्यवाही करणेबाबत श्री.रामानंद तिवारी, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना सूचना दिल्या. त्यानंतर, अध्यक्षांनी श्री.अनिलकुमार लखिना, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या अनुपस्थितीबाबतही विचारणा केली.

बाब क्र.१ : दिनांक २२ फेब्रुवारी, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (१९७ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे..

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : दिनांक २२ फेब्रुवारी, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (१९७ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.

२.१ कार्यवृत्तावरील अहवालाच्या वेळी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अंतर्गत (पर्याय ब) हस्तांतरणीय विकास हक्क व रोकड रकमेसहीत भूसंपादन व बांधलेले गाळे संपादन करणेसाठी प्राप्त निविदाकारांची निवड करणेबाबतच्या विषयावर चर्चा करताना, महानगर आयुक्त यांनी सांगितले की, दिनांक २० जून,२००२ रोजी उच्च न्यायालयात श्री.मनोज मेहता व इतर यांनी लोकहितार्थ दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यात आली, परंतु ती पूर्ण न झाल्यामुळे सदर सुनावणी दिनांक २६.६.२००२ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

२.२ त्यानंतर, प्रलंबित बाब टिप्पणीवरील केलेल्या कार्यवाही अहवालाच्या वेळी खालील बाब टिप्पण्यांवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आले :-

बाब क्र.८ (अ.क्र.२) : मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट वस्तूंचे बाजार (स्थल नियमन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४२) च्या कलम १० नुसार मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, सदस्यांची निवडणूक घेण्याबाबतचे विनियम.

या विषयावरील चर्चेच्या वेळी महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की सिडको, बाजार समिती व प्राधिकरण तसेच व्यापारी प्रतिनिधी यांची बैठक दिनांक १९-६-२००२ रोजी

आयोजित करण्यात आली होती. परंतु अध्यक्ष, बाजार समिती यांच्या प्रकृती अस्वास्थतेमुळे सदरहू बैठक होऊ शकली नाही. सदरहू बैठक पुढील १० दिवसात आयोजित करावी असे निदेश मुख्य सचिव यांनी दिले.

बाब क्र.६ : आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र आणि पश्चिम द्रुतगती मार्ग
(अ.क्र.३) यांना जोडणारा रस्ता -
मुंबई विद्यापीठ, कालिना यांच्याकडून जमीन घेणे.

या विषयावरील चर्चेच्या वेळी सचिव, कार्यकारी समिती यांनी सांगितले की, कार्यवाही अहवालात बाब टिप्पणी सादर करण्यात येईल असे नमूद केले आहे, परंतु या विषयावरील काही तांत्रिक बाबी तपासणे आवश्यक असल्यामुळे सदर बाब पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

२.३ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

बाब क्र.३ : प्राधिकरण / गृहनिर्माण मंडळ इत्यादी संस्था सन २००२-०३ या वित्तीय वर्षापासून प्राधिकरण आयकर कायद्याच्या नियंत्रणाखाली.

३.१ प्राधिकरण हे 'स्थानिक प्राधिकरण' असे मानण्यात येईल असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमात नमूद केले असल्यामुळे प्राधिकरणास आयकर कायद्यामधील कलम १०(२०) अन्वये सूट मिळत होती. परंतु सन २००२-०३ मध्ये आयकर कायद्यामधील कलम १०(२०) मधील बदलामुळे व १०(२०अ) वगळण्यात आल्यामुळे प्राधिकरणास या अगोदर आयकरातून मिळणारी सूट यापुढे मिळणार नाही. प्राधिकरणास आयकरापोटी मोठी रक्कम भरावी लागणार आहे, एवढेच नव्हे तर शासकीय संस्थेकडील ठेवींवर प्राधिकरणास व्याज मिळत नसूनही व्याज मिळाले असे समजून प्राधिकरणास त्यावर आयकर भरावा लागणार आहे असे महानगर आयुक्त यांनी सांगितले. प्राधिकरणास आयकर भरावा लागणार असल्यामुळे त्याचे विपरीत परिणाम प्राधिकरणाच्या एकूण कामकाजावर व निधी उपलब्धतेवर होणार असल्यामुळे नामवंत आयकर सल्लागार श्री. बन्सी मेहता यांच्याकडून याबाबत सल्ला घेण्यात आला आहे.

३.२ श्री. बन्सी मेहता यांच्या सल्ल्यानुसार प्राधिकरणाने आयकर कायद्यातील कलम १२अ (अ)नुसार ट्रस्ट नोंदणीसाठी आयकर आयुक्तांकडे अर्जही केला आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्याकडून केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय मंत्री, शहरी विकास व गरीबी उपशमन, भारत सरकार, यांनाही आयकर कायद्यामधील कलम १०(२०अ) मधील तरतूद रद्द करु नये म्हणून पत्राव्दारे विनंती करण्यात आली आहे. मुख्य सचिव यांच्याकडूनही सचिव (महसूल), वित्त मंत्रालय व सचिव, शहरी विकास व गरीबी उपशमन विभाग यांना याविषयाबाबतची पत्रे पाठविण्यात आली आहेत. तसेच प्राधिकरणाच्या ठेवीवर आयकर कापून व्याज अदा करण्यास बँका व वित्तीय संस्थानी सुरुवात केली आहे असेही महानगर आयुक्तांनी सांगितले.

३.३ मा. मुख्यमंत्री यांनी केंद्रीय मंत्री, शहरी विकास व गरीबी उपशमन यांना आयकर कायद्यातील रद्द करण्यात येणा-या तरतुदी पूर्ववत करण्यासाठी केलेल्या विनंतीची तपासणी शहरी विकास व गरीबी उपशमन या विभागाकडून करण्यात आलेली आहे. आयकर कायद्यातील कलम १०(२०) व १०(२०अ) मधील तरतूद पुन्हा पूर्ववत करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय मंत्री शहरी विकास व गरीबी उपशमन यांनी केंद्रीय वित्त मंत्री यांच्याकडे विचारार्थ पाठविला आहे असे प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले.

३.४ प्राधिकरणाच्या विधी सल्लागाराने प्राधिकरणाने शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम पहावे असा सल्ला दिला आहे ज्यामुळे प्राधिकरणास आयकर भरावा लागणार नाही. विधी सल्लागार यांनी पुढे असेही नमूद केले की, नवी मुंबई येथे सिडको ही संस्था महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत असल्यामुळे या संस्थेची या प्रकल्पातील मिळकत ही शासनाची मिळकत म्हणून ग्राहय धरली जाईल व भारतीय घटनेच्या कलम २८९ अन्वये या मिळकतीवर सिडकोस आयकर लागू होणार नाही, परंतु औरंगाबाद, नांदेड व इतर ठिकाणी राबवित असलेल्या प्रकल्पांवर मात्र सिडकोसही आयकराच्या तरतुदींमधून सूट मिळणार नाही.

३.५ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी प्राधिकरणास ठेवीमधून मिळणा-या व्याजावर व जमीन विक्रीपोटी मिळणा-या अधिमूल्याच्या रकमेवर प्राधिकरणास सुमारे रु.८० ते १०० कोटी इतका आयकर दरवर्षी भरावा लागण्याची शक्यता आहे असे सांगितले. तसेच आयकर कायद्यातील

तरतूदीनुसार प्राधिकरणास आगाऊ आयकर सप्टेंबरपूर्वी भरावा लागणार आहे व आयकर कायद्यातील इतर तरतूदींचीही पूर्तता प्राधिकरणास करावी लागणार आहे. जर आयकर आयुक्तांनी प्राधिकरणाची नोंदणी आयकर कायद्यातील कलम १२अ(अ) अन्वये ट्रस्ट म्हणून करण्यास मान्यता दिली तर प्राधिकरणास आयकर कायद्यातील कलम ११(५) नुसारच यापुढे निधीची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राधिकरणास शासनाकडे ठेव म्हणून रक्कम देणे यापुढे शक्य होणार नाही असे सादर केले.

३.६ अध्यक्ष यांनी असे सूचविले की, प्राधिकरणास आयकर भरावा लागल्यास त्याचे विपरीत परिणाम प्राधिकरणाच्या कामकाजावर होतील त्यामुळे या बाबीचे गांभीर्य ओळखून सर्वतोपरीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्राधिकरणाची उद्दिष्टे ही स्थानिक संस्थांच्या उद्दिष्टांशी काही अंशी सारखी असल्यामुळे प्राधिकरणास आयकर कायद्यातून पुन्हा सूट मिळण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे. हा विषय सध्या केंद्रीय वित्त मंत्रालयात कोणत्या स्तरावर आहे, त्याचा तातडीने पाठपुरावा करण्यास श्री.अजय दुआ, विशेष आयुक्त व प्रधान सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांना सांगण्यात यावे अशा सूचना अध्यक्षांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना दिल्या व पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले :-

(१) प्राधिकरणाने आयकर आयुक्त यांच्याकडे 'ट्रस्ट नोंदणी' साठी केलेल्या अर्जाचा पाठपुरावा करावा व प्राधिकरणाची ट्रस्ट म्हणून नोंदणी सप्टेंबर २००२ पूर्वी करण्यासाठी योग्य ते सर्व प्रयत्न करावेत व आयकर कायद्यातील इतर सर्व तरतुदींची पूर्तता प्राधिकरणाने करावी,

(२) प्राधिकरणाने व नगर विकास विभागाने आयकर कायद्यातील कलम १०(२०) मधील बदल व १०(२०अ) मधील वगळण्यात आलेली तरतूद पुन्हा पुनर्जिवित करण्यासाठी प्रयत्न करावेत,

(३) प्राधिकरणास आयकर भरावा लागू नये म्हणून प्राधिकरणाच्या अधिनियमात काही दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास, उदा. शासनाचा प्रतिनिधी म्हणून प्राधिकरणाने काम पहाणे हा पर्याय ही तपासून घ्यावा व तो अपरिहार्य असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा.

वेळेअभावी बाब क्र. ४, ५ व ६ यावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा संघटनात्मक अभ्यास. (Organisation Study of MMRDA)

७.१ प्राधिकरणाच्या संघटनात्मक अभ्यासामध्ये समंत्रकांनी विचारात घेतलेले मुद्दे व त्यांनी सुचविलेल्या प्राधिकरणाच्या उद्देशांचे विधानावरील (Mission Statement) प्राधिकरणाचे अभिप्राय यांचे सादरीकरण करण्यात आले. यासंबंधी चर्चेची सुरुवात करताना श्री.द.म.सुकथनकर यांनी प्राधिकरण सध्या करीत असलेली कार्ये यापेक्षा दीर्घ मुदतीच्या (Long Term) भविष्यकाळात प्राधिकरणाने काय करावे यानुसार ध्येय ठरविणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच प्राधिकरणाला कायद्याने करता येणार नाहीत अशा बाबी सोडून इतर विविध कार्ये उदा. प्राधिकरण महानगर नियोजन समितीला जास्त साभिप्राय (Meaningful) मदत करु शकेल, साधनसंपत्तीच्या वाटपाच्या निर्णयांवर प्रभाव टाकू शकेल, भांडवली गुंतवणूक योजना बनवू शकेल व समन्वयाची कामे शक्य त्या प्रमाणात करता येऊ शकतील असे सांगितले. मुंबई महानगर प्रदेशात मुलभूत सोयी पुरविण्यासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक खाजगी उद्योजकांकडून उपलब्ध करण्याकरीता प्राधिकरणाने पुढाकार घेऊन मध्यस्थाची भूमिका बजावावी असेही सांगितले.

७.२ महानगर आयुक्तांनी प्राधिकरण ही आता एक प्रादेशिक नियोजन संस्था राहिली नसून प्राधिकरणाने केवळ महानगर नियोजन समितीस याबाबत मदत करणे अभिप्रेत असल्याचे व यासंबंधीची प्राधिकरणाची भूमिका महानगर नियोजन समितीवर बांधिल राहणार नाही असे निदर्शनास आणून दिले. प्राधिकरण साधनसंपत्तीचे वाटप ठरवू शकत नाही तसेच मुंबई महानगर प्रदेशात कार्यरत असलेल्या इतर संस्थांवर याबाबत प्राधिकरणाचे पुरेसे नियंत्रण नसल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय आर्थिक विकास व पर्यावरण नियोजन यासारख्या क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक असलेले तज्ञ मनुष्यबळ प्राधिकरणाकडे नसल्याने व ते घेण्यास शासनाची परवानगी मिळणे अवघड असल्यामुळे अशा कामांची जबाबदारी प्राधिकरणास घेता येणार नाही असेही त्यांनी सांगितले. यासंबंधी मा. अध्यक्षांनी

सांगितले की, प्राधिकरणाची ध्येये व दैनंदिन कामे यामध्ये बदल करणे गरजेचे आहे, तसेच आज प्रादेशिक नियोजन व विकास यासंबंधी विचारमंथन करु शकणारी प्राधिकरणाशिवाय दुसरी संस्था नाही व त्यामुळे या प्रकारच्या कामाची जबाबदारी प्राधिकरणाने उचलणेच जास्त योग्य होईल. महानगर प्रदेशात अनेक क्षेत्रांमध्ये विविध शासकीय संस्था कार्यरत असल्या तरीही प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने त्यांची वाटचाल व्हावी याकरीता प्राधिकरण मदत करु शकेल व यासाठी आवश्यक असल्यास, शासन अशा संस्थांना योग्य आदेश निर्गमित करेल असे प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले.

७.३ प्राधिकरणास जर एका विचारमंथन करणा-या संस्थेची (**Think Tank**) भूमिका पार पाडावयाची असल्यास आवश्यक ती अनुभवी व तज्ञ मंडळी भविष्यकाळात उपलब्ध होण्यामध्ये अडचणी असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. यासंबंधी प्राधिकरणातील व इतर शासकीय संस्थांमधील सक्षम अधिकारी शोधावेत आणि त्यांना प्रशिक्षण व अनुभव देऊन तयार करावेत, कंत्राटावर तज्ञ मंडळी घ्यावीत व तज्ञ सल्लागार नेमून त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राधिकरणाच्या अधिका-यांकडून कामे करुन घ्यावीत इ. उपाययोजना सदस्यांनी सुचविल्या. यासंबंधी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे असे समितीच्या निदर्शनास आले.

७.४ यानंतर, प्राधिकरणाची भूमिका, कार्ये, प्राधिकरणाचे व कार्यकारी समितीचे सदस्यत्व व कार्यकारी समितीच्या कार्यकक्षेविषयी चर्चा झाली. चर्चेनंतर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

(१) श्री.द.म.सुकथनकर यांनी सुचविलेल्या मुद्यांमध्ये योग्य प्रकारे प्रतिबिंबीत होत असल्यामुळे त्यानुसार उद्देशाचे विधानास (**Mission Statement**) अंतिम स्वरुप द्यावे. यामध्ये ही ध्येये साध्य होण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील राहील असा उल्लेख ध्येयाच्या विवरणामध्ये करावा.

(२) आर्थिक विकास व पर्यावरण नियोजन विषयक कामे प्राधिकरणाने करावीत.

(३) समंत्रकांनी सुचविलेल्या प्राधिकरणाच्या सदस्यांमध्ये बदल करुन ते पुढीलप्रमाणे असावेत :-

१. मंत्री, नगर विकास (अध्यक्ष)
२. राज्यमंत्री, नगर विकास विभाग
३. महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका
४. महानगर क्षेत्रातील इतर दोन महापौर - (फिरत्या क्रमाने)

५. २ नगराध्यक्ष - (फिरत्या क्रमाने)
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
८. सचिव, नगर विकास विभाग (१)
९. सचिव, नगर विकास विभाग (२)
१०. सचिव, उद्योग विभाग
११. सचिव, गृहनिर्माण विभाग
१२. सचिव, उर्जा व पर्यावरण विभाग
१३. सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
१४. व्यवस्थापकीय संचालक, सिडको
१५. १ वा २ सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील प्रतिनिधी
१६. महानगर आयुक्त (सदस्य-सचिव)

(४) कार्यकारी समितीची कार्यकक्षा व समितीचे अध्यक्षपद सध्या आहे तसेच ठेवावे. निविदा समिती व कर्मचारी समिती अशा दोन नवीन समित्या स्थापन करण्यात येऊ नयेत.

(५) समंत्रकांनी सुचविलेल्या कार्यकारी समितीच्या सदस्यांमध्ये बदल करुन ते पुढीलप्रमाणे असावेत :-

१. मुख्य सचिव (अध्यक्ष)
२. महानगर आयुक्त
३. सचिव, नगर विकास विभाग (१)
४. सचिव, नगर विकास विभाग (२)
५. सचिव, उद्योग विभाग
६. सचिव, गृहनिर्माण विभाग
७. सचिव, उर्जा व पर्यावरण विभाग
८. सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
९. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
१०. व्यवस्थापकीय संचालक, सिडको
११. महानगर क्षेत्रातील इतर एका महापालिकेचा आयुक्त
१२. ३ तज्ञ

<u>निमंत्रित</u> : आवश्यकतेनुसार सचिव, पाटबंधारे व सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कार्यकारी समितीच्या बैठकीस निमंत्रित करावे.

(६) कार्यकारी समितीने गरज पडेल तेव्हा एखाद्या विषयावर सखोल विचारविनिमय करण्यासाठी उपसमिती नेमावी.

७.५ त्यानंतर, कार्यकारी समितीने सुचविलेले प्राधिकरणाचे ध्येय, भूमिका, कार्ये आणि प्राधिकरण व कार्यकारी समितीची रचना यातील बदल विचारात घेऊन त्यात सुधारणा करावी व त्यानुसार समंत्रकांनी सुचविलेल्या इतर बाबींवरील प्रस्तावांमध्ये सुधारणा करावी व सुधारीत प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर पुन्हा सादर करावा असे ठरले.

वेळेअभावी बाब क्र. ८ ते १४ यावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

<u>बाब क्र.१५</u> : <u>पश्चिम किनाऱ्यालगत प्रवासी जलवाहतूक</u>
- <u>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने देकारासंबंधी कागदपत्रे तयार करण्यासाठी हाती घ्यावयाचा मुख्य अभ्यास.</u>

१५.१ महानगर आयुक्तांनी प्रथम या विषयाची प्रस्तावना विशद केली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) सदर अभ्यास हाती घेण्यासाठी प्राधिकरणाकडे रु.१२५ लाखाचे वित्तीय सहाय्य कर्ज रुपाने मागितले आहे. या अभ्यासापैकी Hydraulic मॉडेल स्टडी करण्यासाठी CWPRS या संस्थेला रु.५० लाख पावसाळा सुरु होण्यापूर्वी देणे आवश्यक होते. म्हणून मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांच्या पूर्व परवानगीने सदर रक्कम एमएसआरडीसीला उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या अगोदर मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व उड्डाणपूल यासाठी घेतलेल्या कर्जाचा हप्ता परत केलेला नाही. या विषयावर चर्चा होऊन कार्यकारी समितीने खालील अटींवर कर्ज देण्याचा प्रस्ताव मान्य केला :-

(अ) राखीव निधीच्या मार्गदर्शक तत्वानुसार कर्जाच्या परतफेडीसाठी एमएसआरडीसी प्राधिकरणाबरोबर करार करील.

(ब) सदर कर्जावर दर साल दर शेकडा १०% व्याजाची आकारणी करण्यात येईल.

(क) कर्ज वितरित केल्याच्या तारखेपासून पुढील दोन वर्षामध्ये किंवा एमएसआरडीसी ने यशस्वी देकार स्वीकारल्याच्या तारखेपासून जी प्रथम असेल तेव्हा पासून व्याजासह कर्जाची परतफेड एकाच हप्त्यामध्ये करावी.

(ड) विविध अभ्यासांवरील जो प्रत्यक्ष खर्च एमएसआरडीसीने केला असेल त्यावर आधारीत कर्जाचे वितरण करण्यात येईल.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८४६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राखीव निधी कर्ज मंजुरी १९९२ अधिनियमाच्या अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि वर नमूद करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मुंबईमध्ये व आजुबाजूच्या परिसरामध्ये आंतरदेशीय प्रवासी जलवाहतूक सेवा सुरु करण्यासाठी आवश्यक असणारे विविध प्रकारचे अभ्यास, उदा. जलशास्त्रीय नमुना अभ्यास (हायड्रोलीक मॉडेल स्टडीज), वाहतूक अभ्यास इत्यादी, हाती घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास १२५ लाख रुपयांचे कर्जास कार्योत्तर मंजूरी कार्यकारी समितीतर्फे देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या संस्थेस वितरण करण्यात आलेल्या रु.५० लाखाच्या कर्जास कार्योत्तर मंजूरी कार्यकारी समितीतर्फे देण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणाच्या ठेवींची / कर्जाची परतफेड न करणा-या संस्थांना निधी देण्यात येऊ नये असा याआधीचा निर्णय सदरहू वितरणापुरता शिथिल करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, योग्य हप्त्यांमध्ये कर्जाचे वितरण करण्यासाठी आणि कर्ज करारनामा करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१६ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी-एन' ब्लॉकमधील इस्पितळाच्या भूखंडावर व 'जी' ब्लॉकच्या शाळेच्या भूखंडावर अतिरिक्त ०.५ चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करताना आकारावयाच्या अधिमूल्याच्या दराबाबतचा प्रस्ताव.

१६.१ महानगर आयुक्तांनी या विषयाची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे विषद केली :-

(अ) शासनाच्या १९९८ च्या अधिसूचनेत इस्पितळे व शाळा यांना द्यावयाच्या वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकासाठी आकारावयाच्या अधिमूल्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे नेमून दिली

आहेत. त्यात इस्पितळांसाठी बाजारभावाच्या ५% व शाळांसाळी बाजारभावाच्या २.५% अधिमूल्य आकारावे व बाजारमूल्य संचालक, नगर रचना यांनी ठरवावे यांचा समावेश आहे.

(ब) प्राधिकरणाने १९९९ मध्ये इस्पितळ व शाळा यांच्या प्रत्येकी एका भूखंडासाठी निविदा मागविताना वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे व निविदेत अनिश्चितता असू नये या दृष्टीने, निविदेत आलेले मूल्य हेच बाजारमूल्य राहील असे गृहीत धरुन त्याच्या ५% दराने इस्पितळासाठी व २.५% दराने शाळेसाठी वाढीव ०.५ चटईक्षेत्र निर्देशांक मिळेल असे आश्वासन दिले होते.

(क) त्यानंतर उच्चतम निविदाकारांना भूखंड दिल्यानंतर त्यांनी जेव्हा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांसाठी अर्ज केले तेव्हा शासनाच्या अधिसूचनेप्रमाणे संबंधित प्रस्ताव नगर विकास विभागास पाठविण्यात आला. त्याचप्रमाणे अशी विनंती करण्यात आली की, उच्चतम निविदेचा दर हाच बाजारभाव म्हणून धरण्यात यावा किंवा प्राधिकरणास निविदेतील अटीप्रमाणे वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्यास परवानगी द्यावी. संचालक, नगर रचना यांनीही निविदेतील अटीप्रमाणे वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्यास अनुमती दर्शविली.

(ड) हे प्रकरण मा.मुख्यमंत्र्यांकडे सादर केले असता या प्रकरणी कार्यकारी समितीने निर्णय घ्यावा असे निर्देश दिल्यावरुन हे प्रकरण सादर केले आहे.

१६.२ अध्यक्षांनी निविदेतील दर संचालक, नगर रचना यांच्या कार्यालयाने ठरविलेले बाजारमूल्य यातील फरक विचारला असता ते दर इस्पितळाच्या बाबतीत अनुक्रमे रु.६०००/- चौ.मी. व रु.१५०००/- चौ.मी. असल्याचे प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले.

१६.३ निविदा रद्द करण्याच्या शक्यतेबद्दल विचारले असता भूखंड देऊन १.५ चटईक्षेत्र निर्देशांकापर्यंतचे बांधकामही झाले असल्याने तसे करता येणे शक्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. अशा परिस्थितीत निविदेतील अटी आता बदलल्यास भूखंडधारक त्या मान्य करणार नाहीत व न्यायालयात जातील असेही नमूद करण्यात आले.

१६.४ प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी प्रस्तुत दोन प्रकरणात निविदेतील अटीप्रमाणे वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्यास, अशी अट यापुढील निविदेत प्राधिकरणाकडून घालण्यात येणार नाही अशा शर्तीवर परवानगी द्यावी असे सुचविले.

१६.५ निविदाकाराने बांधकाम सुरु केल्याने तसेच शाळा व इस्पितळे ही सार्वजनिक उपयोगाची बाब असल्यामुळे व प्राधिकरण वाढीव चटईक्षेत्राची अट यापुढे निविदेमध्ये अंतर्भूत करणार नाही हे विचारात घेऊन कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८४७ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, वांद्रे-कुर्ला संकुलातील "जीएन" ब्लॉकमधील इस्पितळाच्या भूखंडावर व 'जी' ब्लॉकमधील शाळेच्या भूखंडावर संबंधित निविदापत्रातील अटीनुसार वाढीव ०.५ चटईक्षेत्र निर्देशांक देण्यास कार्यकारी समिती मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, अशा प्रकारची अट यापुढे कोणत्याही निविदापत्रात समाविष्ट करण्यात येऊ नये."

वेळेअभावी कार्यकारी समितीची विशेष बैठक पुढे ढकलण्यात आली.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

************